Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004,
MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
E-mail.: appointment.a@unishivaji.ac.in, appointment.b@unishivaji.ac.in

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004
महाराष्ट्र
फोन : ईपीबीएक्स - 2609000, 0231-2609102, 0231-2609103

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/73 दि. 03/02/2023

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त शिक्षण संस्था/अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :– ऑक्टो/नोव्हे. 2022 मधील विद्यापीठीय परीक्षा स्थगित करण्यात येत असल्याबाबत.**

**संदर्भ :– शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/संपवमूमंकार्यालय/64, दि. 01/02/2023.**

महोदय/महोदया,

आपणास आदेशान्वये कळविणेत येते की, शैक्षणिक वर्ष 2022–23 मधील ऑक्टो./नोव्हे. 2022 हिवाळी सत्रातील अभ्यासक्रमाच्या परीक्षा विविध परीक्षा केंद्रावर सुरू आहेत. तथापि, अकृषी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचा–यांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दि. 02.02.2023 पासून परीक्षा कामकाजावर बहिष्कार टाकून आंदोलन सुरू केले आहे. सदर आंदोलनामुळे परीक्षेच्या कामकाजामध्ये व्यत्यय येत असल्याने दि. 02/02/2023 रोजीच्या विद्यापीठामार्फत घेण्यात येणा–या सर्व परीक्षा उपरोक्त संदर्भित पत्रान्वये स्थगित करण्यात आल्याचे जाहिर करण्यात आले होते.

तथापि सदरचा परीक्षा कामावरील बहिष्कार अद्यापही सुरु असल्याने दि. 03/02/2023 व दि. 04/02/2023 रोजीच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहेत याची सर्व महाविद्यालये / शिक्षणसंस्था / सर्व अधिविभाग, विद्यार्थी, पालक, शिक्षक व संबंधित घटक यांनी नोंद घ्यावी.

तसेच दिनांक 02/02/2023 पासून स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे वेळापत्रक व सविस्तर माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. अजितसिंह जाधव)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Estd.1962
A++ Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

## <u>प्रसिद्धीपत्रक</u>

महाराष्ट्र राज्य विद्यापीठीय व महाविद्यालयीन सेवक संयुक्त कृती समिती यांनी दिनांक ०२-०२-२०२३ पासून आंदोलनाचा तसेच परीक्षांच्या कामकाजावर बहिष्काराचा निर्णय घेतलेला आहे. सदर आंदोलनामुळे परीक्षेच्या कामकाजामध्ये अडथळा येत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दिनांक ०२-०२-२०२३ रोजीच्या विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षा दि.०१-०२-२०२३ रोजीच्या पत्रान्वये स्थगित करण्यात आल्याबाबत शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये, संस्था, अधिविभाग यांना कळविण्यात आलेले आहे.

तथापि सदरच्या परीक्षा कामावरील बहिष्कार अद्यापही सुरु असल्याने दि.०३-०२-२०२३ व दि.०४-०२-२०२३ रोजीच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पुढील आदेश होईपर्यंत स्थगित करण्यात येत आहेत याची सर्व संस्था, विद्यार्थी, पालक ,शिक्षक व संबंधित घटक यांनी नोंद घ्यावी.

दिनांक ०२-०२-२०२३ रोजीपासून स्थगित करण्यात आलेल्या परीक्षांचे वेळापत्रक व सविस्तर माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**स्थळ: कोल्हापूर**
**दिनांक: ०२-०२-२०२३**